ASO मुख्य 2020

D → संच क्रमांक

2020

T14

प्रश्नपुस्तिका क्रमांक
BOOKLET NO. 200944

प्रश्नपुस्तिका – II

# सामान्य क्षमता चाचणी व पदाच्या कर्तव्यासाठी आवश्यक ज्ञान

वेळ : 1 (एक) तास

एकूण प्रश्न : 100
एकूण गुण : 200

## सूचना

(1) सदर प्रश्नपुस्तिकेत 100 अनिवार्य प्रश्न आहेत. उमेदवारांनी प्रश्नांची उत्तरे लिहिण्यास सुरुवात करण्यापूर्वी या प्रश्नपुस्तिकेत सर्व प्रश्न आहेत किंवा नाहीत याची खात्री करून घ्यावी. तसेच अन्य काही दोष आढळल्यास ही प्रश्नपुस्तिका समवेक्षकांकडून लगेच बदलून घ्यावी.

(2) आपला परीक्षा–क्रमांक ह्या चौकोनांत **न विसरता बॉलपेनने** लिहावा.

| परीक्षा–क्रमांक | P | N | 0 | 0 | 1 | 0 | 0 | 8 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | केंद्राची संकेताक्षरे | | | | | | | शेवटचा अंक |

(3) वर छापलेला प्रश्नपुस्तिका क्रमांक तुमच्या उत्तरपत्रिकेवर विशिष्ट जागी उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे **न विसरता नमूद करावा.**

(4) (अ) या प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाला 4 पर्यायी उत्तरे सुचविली असून त्यांना 1, 2, 3 आणि 4 असे क्रमांक दिलेले आहेत. त्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तराचा क्रमांक उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे तुमच्या उत्तरपत्रिकेवर नमूद करावा. अशा प्रकारे उत्तरपत्रिकेवर उत्तरक्रमांक नमूद करताना तो संबंधित प्रश्नक्रमांकासमोर छायांकित करून दर्शविला जाईल याची काळजी घ्यावी. **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.**

(ब) **आयोगाने ज्या विषयासाठी मराठी बरोबर इंग्रजी माध्यम विहित केलेले आहे. त्या विषयाचा प्रत्येक प्रश्न मराठी बरोबर इंग्रजी भाषेत देखील छापण्यात आला आहे. त्यामधील इंग्रजीतील किंवा मराठीतील प्रश्नामध्ये मुद्रणदोषांमुळे अथवा अन्य कारणांमुळे विसंगती निर्माण झाल्याची शंका आल्यास, उमेदवाराने संबंधित प्रश्न पर्यायी भाषेतील प्रश्नाशी ताडून पहावा.**

(5) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत. यास्तव सर्व प्रश्नांची उत्तरे द्यावीत. घाईमुळे चुका होणार नाहीत याची दक्षता घेऊनच शक्य तितक्या वेगाने प्रश्न सोडवावेत. क्रमाने प्रश्न सोडविणे श्रेयस्कर आहे पण **एखादा प्रश्न कठीण वाटल्यास त्यावर वेळ न घालविता पुढील प्रश्नाकडे वळावे.** अशा प्रकारे शेवटच्या प्रश्नापर्यंत पोहोचल्यानंतर वेळ शिल्लक राहिल्यास कठीण म्हणून वगळलेल्या प्रश्नांकडे परतणे सोईस्कर ठरेल.

(6) उत्तरपत्रिकेत एकदा नमूद केलेले उत्तर खोडता येणार नाही. नमूद केलेले उत्तर खोडून नव्याने उत्तर दिल्यास ते तपासले जाणार नाही. एकापेक्षा जास्त उत्तरे नमूद केल्यास ते उत्तर चुकीचे धरले जाईल व त्या चुकीच्या उत्तराचे गुण वजा केले जातील.

(7) **प्रस्तुत परीक्षेच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करताना उमेदवाराच्या उत्तरपत्रिकेतील योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील. तसेच "उमेदवाराने वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाच्या प्रश्नांची दिलेल्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तरेच उत्तरपत्रिकेत नमूद करावीत. अन्यथा त्यांच्या उत्तरपत्रिकेत सोडविलेल्या प्रत्येक चुकीच्या उत्तरांसाठी 25% किंवा 1/4 गुण वजा/कमी करण्यात येतील."**

## ताकीद

**ह्या प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपेपर्यंत ही प्रश्नपुस्तिका आयोगाची मालमत्ता असून ती परीक्षाकक्षात उमेदवाराला परीक्षेसाठी वापरण्यास देण्यात येत आहे. ही वेळ संपेपर्यंत सदर प्रश्नपुस्तिकेची प्रत/प्रती, किंवा सदर प्रश्नपुस्तिकेतील काही आशय कोणत्याही स्वरूपात प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे कोणत्याही व्यक्तीस पुरविणे, तसेच प्रसिद्ध करणे हा गुन्हा असून अशी कृती करणाऱ्या व्यक्तीवर शासनाने जारी केलेल्या "परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचा अधिनियम–82" यातील तरतुदीनुसार तसेच प्रचलित कायद्याच्या तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.**

**तसेच ह्या प्रश्नपत्रिकेसाठी विहित केलेली वेळ संपण्याआधी ही प्रश्नपुस्तिका अनधिकृतपणे बाळगणे हा सुद्धा गुन्हा असून तसे करणारी व्यक्ती आयोगाच्या कर्मचारीवृंदापैकी, तसेच परीक्षेच्या पर्यवेक्षकीयवृंदापैकी असली तरीही अशा व्यक्तीविरूद्ध उक्त अधिनियमानुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती शिक्षेस पात्र होईल.**

पुढील सूचना प्रश्नपुस्तिकेच्या अंतिम पृष्ठावर पहा



Scanned with OKEN Scanner

1. सात ख्रिसमस भेटवस्तू आणि सात संगत खुणा केलेले एकसारखे खोके आहेत. जर भेटी यादृच्छिक रीतीने खोक्यात ठेवल्या तर नेमक्या सहा भेटी नेमक्या योग्य खुणेच्या खोक्यात जाण्याची संभाव्यता निवडा.

(1) 1/6 (2) शून्य (3) 1/7 (4) 6/7

There are seven Christmas gifts and seven correspondingly tagged identical boxes. If the gifts are randomly put in the boxes, select the probability that exactly six gifts go into the correctly tagged boxes.

(1) 1/6 (2) Zero (3) 1/7 (4) 6/7

2. सर्व विद्यार्थ्यांच्या गटात 3/5 मुली आहेत आणि यातील 1/3 मुलींनी इंग्रजीमध्ये 75% च्या वर गुण मिळवले. जर 15 मुलींनी इंग्रजीमध्ये 75% च्या वर गुण मिळवले असतील तर मुली नसलेल्या विद्यार्थ्यांची संख्या दर्शवणारा पर्याय निवडा.

(1) 75 (2) 90 (3) 60 (4) 30

In a group 3/5 of all students are girls and 1/3 of girls scored above 75% marks in English. If 15 girls have scored above 75% in English, then select the option that indicates the number of students who are not girls.

(1) 75 (2) 90 (3) 60 (4) 30

3. वैध निष्कर्ष निवडा.

**सत्य विधाने :** काही रांगा प्राणी आहेत. काही प्राणी कुस्तीगीर आहेत. सर्व कुस्तीगीर कविता आहेत.

**निष्कर्ष :**

(a) काही कुस्तीगीर प्राणी आहेत.

(b) काही कविता रांगा आहेत.

(c) सर्व रांगा कविता आहेत.

(d) काही कविता प्राणी आहे.



**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (a) व (b)
(2) फक्त (a) व (d)
(3) फक्त (a) व (c)
(4) फक्त (b) व (c)

Select valid conclusions.

**True statements :** Some queues are animals. Some animals are wrestlers. All the wrestlers are poems.

**Conclusions :**

(a) Some wrestlers are animals.

(b) Some poems are queues.

(c) All the queues are poems.

(d) Some poems are animals.

**Answer options :**

(1) Only (a) and (b)
(2) Only (a) and (d)
(3) Only (a) and (c)
(4) Only (b) and (c)

4. "मिताने जमनावर मात केली", हा निष्कर्ष नेहमी सत्य ठरवणारी दोन तथ्ये ओळखा.

तथ्ये :

(a) जमना व मिता या दोघींनी तानीवर मात केली, जी सर्वात शेवटी आली.

(b) मिता दुसरी आली.

(c) जमनाने तानीवर मात केली पण ती पहिली आली नाही.

(d) मिताने शामावर मात केली.

पर्यायी उत्तरे :

(1) (a), (b) (2) (a), (c) (3) (b), (c) (4) (b), (d)

Identify two facts that prove conclusion, "Mita beat Jamna" to be always true.

**Facts :**

(a) Jamna and Mita both beat Tani, who finished last.

(b) Mita finished runner-up.

(c) Jamna beat Tani but did not stand first.

(d) Mita beat Shama.

**Answer options :**

(1) (a), (b) (2) (a), (c) (3) (b), (c) (4) (b), (d)

5. नऊ क्रमवार विषम संख्याची सरासरी 103 आहे. तर त्यातील सर्वात मोठ्या दोन संख्यांची सरासरी काय असेल ?

(1) 109 (2) 112 (3) 110 (4) 107

The average of the Nine consecutive odd numbers is 103. So what will be the average of the two largest numbers of them ?

(1) 109 (2) 112 (3) 110 (4) 107

6. एका मार्च महिन्यातील शेवटचा रविवार कोणत्या वारी आला आहे या प्रश्नसंदर्भात दिलेल्या विदेचा पुरेसेपणा निश्चित करा.

विदा विधाने :

(a) शुक्रवार हा त्या महिन्याचा शेवटचा दिवस आहे.

(b) त्या महिन्याच्या पहिल्या रविवारी 5 तारीख आहे.

पर्यायी उत्तरे :

(1) (a) व (b) दोन्ही आवश्यक.

(2) फक्त (a) पुरेशी नाही.

(3) फक्त (a) किंवा (b) पुरेशी आहे.

(4) फक्त (b) पुरेशी नाही.

Decide sufficiency of data with respect to the question : On which date the last Sunday of month March was ?

**Data statements :**

(a) The last day of that month was Friday.

(b) The first Sunday of that month fell on $5^{th}$.

**Answer options :**

(1) Both (a) and (b) are necessary.

(2) (a) alone is not sufficient.

(3) Either (a) or (b) is sufficient.

(4) (b) alone is not sufficient.

कच्च्या कामासाठी जागा / **SPACE FOR ROUGH WORK**



Scanned with OKEN Scanner

7. जर A + B चा अर्थ A ही B ची आई आहे; A − B चा अर्थ A ही B ची बहीण आहे; A × B चा अर्थ A हे B चे वडील आहेत आणि A ÷ B चा अर्थ A हा B चा भाऊ आहे तर N हा M चा मामा आहे या अर्थाचे विधान निवडा.

(1) N ÷ P − L + E − M (2) M − Y × P − N + E (3) N − Y + A ÷ M + E (4) N ÷ C + F × M − L

If A + B means A is the mother of B; A − B means A is the sister of B; A × B means A is the father of B and A ÷ B means A is the brother of B. Then select the statement that means N is the maternal uncle of M.

(1) N ÷ P − L + E − M (2) M − Y × P − N + E (3) N − Y + A ÷ M + E (4) N ÷ C + F × M − L

---

8. आधुनिक समाजातील अनेक लोक खिन्नतेने त्रस्त असतात. मेंदूच्या रासायनिक संतुलनात फेरफार करणाऱ्या काही औषधांमार्फत त्यात उतार करता येतो. तथापि सहानुभूती असणारी कुशल मानवी सोबती समस्येसंबंधी व्यक्तीची मानसिक चौकट अधिक सकारात्मक करण्याच्या हेतूने बोलतो म्हणून व्यक्ती मानसोपचार घेऊ शकते. म्हणून ज्या खिन्नमनस्क व्यक्तींना मेंदूच्या रासायनिक स्थितीत फेरफार करण्याची कल्पना आवडत नाही त्यांनी मानसोपचार निवडायला हरकत नाही.

पुढील विधानांतून वरील युक्तिवादाला आधारभूत गृहीतक निवडा.

(1) मानसोपचार मेंदूतील रासायनिक स्थितीत फेरफार करत नाही.

(2) खिन्नमनस्कतेसाठी औषधांपेक्षा मानसोपचार अधिक प्रभावी उपचार आहे.

(3) मानसोपचार औषधांच्या उपचारांसोबत एकत्रित करता येत नाही.

(4) मानवाच्या अस्तित्वाबरोबरच खिन्नमनस्कता ही नेहमीच त्याच्यासोबत आहे.

Many people suffer from depression in modern society. This can be alleviated through certain drugs that alter the chemical balance of the brain. However, the individual can undergo psychotherapy that involves talking through problems with a sympathetic and skilled fellow human being with a view to putting the subject in a more positive frame of mind. Depressed individuals who do not like the idea of their brain chemistry being altered should therefore choose psychotherapy. Select an underlying assumption of the above argument from following statements.

(1) Psychotherapy does not alter the brain chemistry.

(2) Psychotherapy is more effective than drugs in treating depression.

(3) Psychotherapy cannot be combined with drug treatments.

(4) Depression is always there with human beings when he came to existence.

---

9. एका क्रीडा मंडळात एकूण 240 खेळाडू आहेत. त्यापैकी 15 टक्के व्हॉलीबॉल, बॉस्केटबॉल आणि क्रिकेट हे तिन्ही खेळ खेळू शकतात. या खेळांपैकी कोणतेही दोन आणि फक्त दोन खेळ खेळणारे खेळाडूही यात आहेत व त्यांची संख्या 60 आहे. फक्त व्हॉलीबॉल खेळणाऱ्या खेळाडूंची संख्या 80 आहे. फक्त बॉस्केट बॉलच खेळतात किंवा फक्त क्रिकेटच खेळतात, अशा एकूण खेळाडूंची संख्या किती ?

(1) 60 (2) 58 (3) 63 (4) 64

Out of a total of 240 players in a sports club 15% can play all three games-Volleyball, Basketball and Cricket. It so happens that the number of players who can play any two and only two of the above games is 60. The number of players who can play the Volleyball alone is 80. What is the total number of those who can play Basketball alone and or Cricket alone ?

(1) 60 (2) 58 (3) 63 (4) 64

---

P.T.O.

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK



Scanned with OKEN Scanner

10. एका संकेत प्रणालीनुसार, 'poachers killed some tigers' चा संकेत 'sto del war vqr' हा आहे, 'tigers are brave creatures' चा संकेत 'puz war lyn mul' हा आहे, 'some watchmen are brave' चा संकेत 'sto mul lyn kig' असा आहे आणि 'watchmen are searching poachers' चा संकेत 'del agf kig lyn' असा आहे. या संकेत प्रणालीनुसार 'creatures killed watchman' चा संकेत निवडा.

(1) kig, agf, del (2) vqr, puz, kig (3) puz, del, vqr (4) lyn, kig, agf

According to certain coding system, 'poachers killed some tigers' is coded as 'sto del war vqr', 'tigers are brave creatures' is coded as 'puz war lyn mul', 'some watchmen are brave' is coded as 'sto mul lyn kig' and 'watchmen are searching poachers' is coded as 'del agf kig lyn'. Select the code for 'creatures killed watchman'.

(1) kig, agf, del (2) vqr, puz, kig (3) puz, del, vqr (4) lyn, kig, agf

11. एका प्राणी गटात बाल व प्रौढ माद्या आहेत. नवजात मादी एका महिन्यात प्रौढत्व प्राप्त करते आणि जर परिस्थिती अनुकूल असेल तर पाच वर्षापर्यंत दर महिन्याला सरासंरी एका नवजात मादीला जन्म देते. जर एका गटात सुरुवातीला एक नवजात मादी असेल तर दहा महिन्यांनंतर लगेचच त्यात किती माद्या असतील ?

(1) 71 (2) 76 (3) 81 (4) 89

In a certain animal group there are juvenile as well as adult females. Infant female attains adulthood in one month and on an average gives birth to one new juvenile female every month for about five years if conditions are favourable. If there is one new borne female in a group to begin with then how many females will be there immediately after ten months ?

(1) 71 (2) 76 (3) 81 (4) 89

12. प्रत्येक मोठी कोंबडी दर दिवशी सारख्या प्रमाणात अन्न खाते आणि लहान कोंबड्यांबाबतही असेच आहे. एक मोठी आणि दोन लहान कोंबड्या एक दिवसात कुक्कुट अन्नाच्या 100 गुटिका खातात. दोन मोठ्या आणि तीन लहान कोंबड्यांना खाण्यासाठी 175 अन्न गुटिका लागतात. या माहितीच्या आधारे दिलेल्या पर्यायांतून चुकीचे विधान निवडा.

(1) लहान कोंबडीला 24 तासांपेक्षा थोड्या जास्त काळासाठी खाद्य द्यायला 30 अन्न गुटिका पुरेशा आहेत.
(2) तीन मोठ्या व दहा लहान कोंबड्यांना प्रत्येक दिवशी खाद्य देण्यासाठी 450 अन्न गुटिका लागतील.
(3) मोठ्या कोंबडीला दिवसभराचे खाद्य म्हणून 65 अन्न गुटिका पुरेशा आहेत.
(4) लहान कोंबडीशी तुलना केल्यास मोठी कोंबडी दुपटीने अन्न खाते.

Each of large chicken consumes equal quantity of food every day and same is the case with the small chickens. One large and two small chickens feed on 100 pellets of chicken food in a day. 175 pellets of food are needed for feeding two large and three small chickens in a day. Select the false statement from options on the basis of this information.

(1) Thirty pellets are sufficient to feed one small chicken for little longer duration than 24 hours.
(2) 450 pellets are needed for feeding three large and ten small chickens every day.
(3) For feeding one large chicken for a day 65 pellets are sufficient.
(4) Large chicken consumes double quantity of food when compared to small chicken.

13. एका व्यक्तीचे आजचे वय त्याच्या आईच्या आजच्या वयाच्या 2/5 इतके आहे. 8 वर्षानंतर ते त्याच्या आईच्या त्यावेळेच्या वयाच्या 1/2 इतके असेल तर त्याच्या आईचे आजचे वय किती ?

(1) 70 (2) 60 (3) 40 (4) 62

A person's present age is 2/5 of the age of his mother. After 8 years he will be 1/2 of the age of his mother. How old is mother at present ?

(1) 70 (2) 60 (3) 40 (4) 62

कच्च्या कामासाठी जागा / **SPACE FOR ROUGH WORK**



Scanned with OKEN Scanner

**14.** विश्व जे काम 8 दिवसात करतो तेच काम करायला सृष्टीला 10 दिवस लागतात. जर दोघे मिळून ते काम करत असतील तर ते काम पूर्ण करण्यास किती वेळ लागेल ?

(1) $10\frac{1}{2}$ दिवस (2) $6\frac{1}{2}$ दिवस (3) $\frac{4}{9}$ दिवस (4) $4\frac{4}{9}$ दिवस

Vishwa can finish the work in 8 days. While Srushti can finish the same work in 10 days. If they work together then how long they will take to finish the same work ?

(1) $10\frac{1}{2}$ days (2) $6\frac{1}{2}$ days (3) $\frac{4}{9}$ days (4) $4\frac{4}{9}$ days

**15.** सफल आणि दियाने गुप्तपणे संदेश लेखनासाठी संकेतप्रणाली तयार केली आहे. ती प्रणाली पुढील नियमांवर आधारित आहे.

(a) A ते M पर्यंतच्या प्रत्येक अक्षराऐवजी N ते Z पर्यंतची समक्रम अक्षरे ठेवायची. याप्रमाणे A ऐवजी N, B ऐवजी O इत्यादी आणि N ते Z अक्षराऐवजी A ते M अक्षरे उलट्या क्रमाने मांडून समक्रम अक्षरे ठेवायची. याप्रमाणे N ऐवजी M, Z ऐवजी A याप्रमाणे.

(b) प्रक्रिया 1 मधून मिळालेल्या प्रत्येक अक्षराऐवजी वर्णाक्षरे उलट्या क्रमाने मांडून त्या प्रत्येक अक्षराचा दोन अंकी क्रम तेथे ठेवायचा. म्हणजे A होईल 26, B होईल 25, X होईल 03, याप्रमाणे.

या प्रणालीनुसार INVESTOR या शब्दाचा संकेत निवडा.

(1) 0514220919201518 (2) 0514210919211518

(3) 0513220919201519 (4) 0514211019201318

Safal and Dia formulated a coding system for texting the messages secretly. This system is based on following rules.

(a) Replace each letter from A to M by equivalent letters from N to Z; thus A is replaced by N, B is replaced by O and continued. And letters from N to Z are replaced by equivalent letters by arranging A to M in reverse order; thus N is replaced by M, Z is replaced by A and continued.

(b) Replace each letter resulting from operation 1 by a two digit number according to its place in the alphabets arranged in reversed order using; so A becomes 26, B becomes 25, X becomes 03 and so on.

Select the coded form of word INVESTOR according to this system.

(1) 0514220919201518 (2) 0514210919211518

(3) 0513220919201519 (4) 0514211019201318



Scanned with OKEN Scanner

16. खालील विधाने पहा :
(a) प्रवरा नदी ही गोदावरीची उपनदी असून ती हरिश्चंद्र डोंगराच्या उत्तरेस स्थित आहे.
(b) वर्धा आणि वैनगंगा या गोदावरी नदीच्या उपनद्या आहेत.

**पर्यायी उत्तरे :**

(1) विधान (a) बरोबर आहे (2) विधान (b) बरोबर आहे
(3) विधाने (a) आणि (b) बरोबर आहेत (4) विधाने (a) आणि (b) बरोबर नाहीत

Observe the following statements :
(a) Pravara is a tributary of river Godavari and located to the north of Harishchandra mountain.
(b) Wardha and Vainganga are the tributaries of river Godavari.

**Answer options :**

(1) Statement (a) is correct (2) Statement (b) is correct
(3) Statements (a) and (b) are correct (4) Statements (a) and (b) are not correct

17. खालील विधाने पहा :
(a) गडचिरोली जिल्ह्याची दक्षिण सिमा ही इंद्रावती व प्राणहिता नद्यांनी बनलेली आहे.
(b) इंद्रावती नदी ही छत्तीसगड राज्याच्या सिमेवर असून, प्राणहिता नदी ही तेलंगणा राज्याशी असलेल्या सिमेवर आहे.

**पर्यायी उत्तरे :**

(1) (a) आणि (b) बरोबर (2) (a) बरोबर (b) चूक
(3) (a) चूक (b) बरोबर (4) (a) आणि (b) चूक

Observe the following statements :
(a) The Indravati and Pranhita rivers form the Southern boundary of the Gadchiroli district.
(b) The Indravati forms a boundary with Chhattisgarh state while the Pranhita with Telangana state.

**Answer options :**

(1) (a) and (b) True (2) (a) True (b) False
(3) (a) False (b) True (4) (a) and (b) False

18. कोणते चक्रीवादळ 17-05-2021 दरम्यान महाराष्ट्राच्या किनारपट्टीवर परिणाम करून गेले ?
(1) निसर्ग (2) गुलाब (3) तौक्ते (4) वरीलपैकी नाही
Which cyclonic storm affected the coast of Maharashtra during 17-05-2021 ?
(1) Nisarg (2) Gulab (3) Tauktae (4) None of the above

19. महाराष्ट्रातील घाटांचा उत्तरेकडून दक्षिणेकडे कोणता क्रम बरोबर आहे ?
(1) कुंभार्ली, आंबा, आंबोली, फोंडा
(2) कुंभार्ली, आंबा, फोंडा, आंबोली
(3) आंबा, कुंभार्ली, फोंडा, आंबोली
(4) आंबोली, फोंडा, कुंभार्ली, आंबा
Which of the following sequence of ghats in Maharashtra from north to south is **correct** ?
(1) Kumbharli, Amba, Amboli, Phonda
(2) Kumbharli, Amba, Phonda, Amboli
(3) Amba, Kumbharli, Phonda, Amboli
(4) Amboli, Phonda, Kumbharli, Amba



Scanned with OKEN Scanner

20. खालील विधाने पहा.

(a) जालना जिल्हा हिंगोली जिल्ह्याच्या पूर्वेस आहे.

(b) धुळे आणि नंदूरबार जिल्ह्यास दोन राज्यांच्या सिमा आहेत.

(c) महाराष्ट्र राज्याचे भौगोलिक क्षेत्रफळ 307713 चौ.कि.मी. आहे.

पर्यायी उत्तरे :

(1) फक्त विधान (a) बरोबर नाही.

(2) फक्त विधान (b) बरोबर नाही.

(3) फक्त विधान (c) बरोबर नाही.

(4) विधान (a) आणि (b) बरोबर नाहीत.

Observe the following statements :

(a) Jalna district is located to the east of Hingoli district.

(b) Dhule and Nandurbar districts have borders of two states.

(c) The Geographical area of Maharashtra state is 307713 sq.km.

**Answer options :**

(1) Only statement (a) is incorrect

(2) Only statement (b) is incorrect

(3) Only statement (c) is incorrect

(4) Statements (a) and (b) are incorrect

---

21. राज्यात ग्रामीण भागात घरे बांधण्यासाठी कोणती योजना आली व ती कधी सुरू झाली ?

(1) डॉ. मुखर्जी निवारा योजना – 2014

(2) इंदिरा आवास योजना – 1989

(3) जवाहर आवास योजना – 1995

(4) रोजगार हमी योजना – 2011

When and which house building scheme was started in rural area of the state ?

(1) Dr. Mukharji Niwara Yojana - 2014

(2) Indira Awas Yojana - 1989

(3) Jawahar Awas Yojana - 1995

(4) Rojgar Hami Yojana - 2011

---



Scanned with OKEN Scanner

22. जोड्या जुळवा :

| प्रशासकीय विभाग | | तालुका | |
|---|---|---|---|
| (a) | अमरावती | (i) | खालापूर |
| (b) | नागपूर | (ii) | सेनगाव |
| (c) | औरंगाबाद | (iii) | भिवापूर |
| (d) | कोंकण | (iv) | घाटंजी |

पर्यायी उत्तरे :

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| (1) | (iv) | (iii) | (ii) | (i) |
| (2) | (i) | (ii) | (iii) | (iv) |
| (3) | (iii) | (i) | (ii) | (iv) |
| (4) | (iv) | (iii) | (i) | (ii) |

Match the following :

| Administrative Division | | Tahsil | |
|---|---|---|---|
| (a) | Amravati | (i) | Khalapur |
| (b) | Nagpur | (ii) | Sengaon |
| (c) | Aurangabad | (iii) | Bhivapur |
| (d) | Konkan | (iv) | Ghatanji |

**Answer options :**

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| (1) | (iv) | (iii) | (ii) | (i) |
| (2) | (i) | (ii) | (iii) | (iv) |
| (3) | (iii) | (i) | (ii) | (iv) |
| (4) | (iv) | (iii) | (i) | (ii) |

---

23. जनगणना 2001 आणि 2011 प्रमाणे ठाणे जिल्ह्यामध्ये ________ आणि ________ शहरे होती.

(1) 27 आणि 47 (2) 48 आणि 51 (3) 37 आणि 51 (4) 50 आणि 56

As per the census 2001 and 2011 ________ and ________ towns exist in Thane district.

(1) 27 and 47 (2) 48 and 51 (3) 37 and 51 (4) 50 and 56

---

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK



Scanned with OKEN Scanner

D

24. जोड्या जुळवा :

| | जिल्हा | | तालुका |
|---|---|---|---|
| (a) | गडचिरोली | (i) | जिवती |
| (b) | चंद्रपूर | (ii) | देवरी |
| (c) | गोंदिया | (iii) | मुलचेरा |
| (d) | भंडारा | (iv) | लाखणी |

पर्यायी उत्तरे :

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| (1) | (ii) | (iii) | (iv) | (i) |
| (2) | (iii) | (i) | (ii) | (iv) |
| (3) | (iv) | (iii) | (i) | (ii) |
| (4) | (ii) | (iv) | (iii) | (i) |

Match the following :

| | **District** | | **Taluka** |
|---|---|---|---|
| (a) | Gadchiroli | (i) | Jiwati |
| (b) | Chandrapur | (ii) | Deori |
| (c) | Gondia | (iii) | Mulchera |
| (d) | Bhandara | (iv) | Lakhani |

**Answer options :**

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| (1) | (ii) | (iii) | (iv) | (i) |
| (2) | (iii) | (i) | (ii) | (iv) |
| (3) | (iv) | (iii) | (i) | (ii) |
| (4) | (ii) | (iv) | (iii) | (i) |

25. खालील विधानांचा विचार करा :

(a) महाराष्ट्रात सर्वाधिक पाऊस सिंधुदुर्ग जिल्ह्यातील आंबोली येथे पडतो.

(b) आंबोलीच्या तीन बाजूंनी डोंगर व वाऱ्याच्या प्रवेशाची बाजू मोकळी आहे.

पर्यायी उत्तरे :

(1) दोन्ही विधाने बरोबर व दुसरे विधान पहिल्या विधानाचे योग्य स्पष्टीकरण आहे.

(2) दोन्ही विधाने चुकीची आहेत.

(3) दोन्ही विधाने बरोबर परंतु दुसरे विधान पहिल्या विधानाचे योग्य स्पष्टीकरण नाही.

(4) पहिले विधान बरोबर परंतु दुसरे चूक.

Consider the following statements :

(a) The highest rain in Maharashtra falls at Amboli in Sindhudurg district.

(b) Mountains on three sides of Amboli and the entrance to the wind is open.

**Answer options :**

(1) Both the statements are correct and second is the correct explanation of first.

(2) Neither of the statements is correct.

(3) Both the statements are correct but the second is not the explanation of the first.

(4) The first statement is correct but the second is not correct.

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK



Scanned with OKEN Scanner

26. 25 सप्टेंबर 1916 रोजी मद्रास येथे डॉ. ॲनी बेझंट यांनी कोणत्या स्वतंत्र संघटनेची स्थापना केली ?

(1) होमरुल लीग
(2) कॉमन वील
(3) हिंदू महासभा
(4) स्वराज्य संघ

Which union was established by Dr. Annie Besant on 25 September 1916 at Madras ?

(1) Homerule League
(2) Common Weal
(3) Hindu Mahasabha
(4) Swarajya Sangh

27. हंटर कमिशनमुळे शिक्षण व्यवस्थेत कोणते बदल झाले ?

(a) खाजगी क्षेत्राला प्राधान्य दिले.
(b) लोकशिक्षण विभाग स्थापन करण्यात आला.
(c) पंजाब (1882) आणि अलाहाबाद (1887) विद्यापीठांची स्थापना झाली.
(d) शारीरिक आणि बौद्धिक शिक्षणाला महत्व दिले.

पर्यायी उत्तरे :

(1) (b), (c), (d)
(2) (a), (b), (d)
(3) (b), (d)
(4) (a), (c), (d)

Which changes took place because of Hunter Commission ?

(a) Priority was given to private sector.
(b) Department of Public Instruction was established.
(c) Punjab (1882) and Allahabad (1887) Universities were established.
(d) Importance was given to Physical and Intellectual Education.

**Answer options :**

(1) (b), (c), (d)
(2) (a), (b), (d)
(3) (b), (d)
(4) (a), (c), (d)

28. वृत्तपत्राविषयी कोणती विधाने योग्य आहेत ?

(a) भाऊ महाजन यांनी 'प्रभाकर' नावाचे साप्ताहिक सुरु केले.
(b) आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांनी 'इंदूप्रकाश' हे वृत्तपत्र चालविले.
(c) कोल्हापूर जिल्ह्यातून 'श्री शाहू' व 'शुभसूचक' ही वृत्तपत्रे सुरु झाली.
(d) विष्णू बुवा ब्रम्हचारी यांनी 'वर्तमानदीपिका' या वृत्तपत्रातून आपले विचार मांडले.

पर्यायी उत्तरे :

(1) (a), (b), (c) विधाने बरोबर आहेत
(2) (a), (d) विधाने बरोबर आहेत
(3) (a), (c), (d) विधाने बरोबर आहेत
(4) (a), (b) विधाने बरोबर आहेत

Which statements are **true** regarding Newspapers ?

(a) Bhau Mahajan started weekly 'Prabhakar'.
(b) Acharya Bal Shastri Jambhekar ran 'Induprakash' Newspaper.
(c) 'Shri Shahu' and 'Shubhsuchak' Newspapers started from Kolhapur District.
(d) Vishnu Buwa Brahmachari expressed his thoughts through 'Vartamandipika' Newspaper

**Answer options :**

(1) (a), (b), (c) statements are correct
(2) (a), (d) statements are correct
(3) (a), (c), (d) statements are correct
(4) (a), (b) statements are correct

कच्च्या कामासाठी जागा / **SPACE FOR ROUGH WORK**



Scanned with OKEN Scanner

29. निरनिराळ्या प्रांतातील लोकांनी एकमेकांच्या भाषा व चालीरीती समजून घ्याव्यात यासाठी 'आंतर भारती' ही कल्पना ________ यांनी मांडली.

(1) डॉ. मुंजे (2) डॉ. हेडगेवार (3) लोकमान्य टिळक (4) साने गुरुजी

________ proposed the concept of Antar Bharati to ensure that people from different regions were acquainted with other cultures and languages.

(1) Dr. Munje (2) Dr. Hedgewar (3) Lokmanya Tilak (4) Sane Guruji

30. खालीलपैकी अयोग्य विधाने ओळखा :

(a) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 'हरिजन सेवक संघाची' स्थापना केली.

(b) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी छत्रपती शाहू महाराजांनी दिलेल्या देणगीतून 'समता' हे वृत्तपत्र चालविले.

(c) पहिल्या गोलमेज परिषदेत महात्मा गांधी व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यात अस्पृश्यांसाठी स्वतंत्र मतदार संघ देण्याबाबत वाद झाले.

(d) 'महार मांग इत्यादि लोकांस विद्या शिकविण्यासाठी मंडळी' या संस्थेस दक्षिणा प्राईज फंडातून साह्य मिळाले.

पर्यायी उत्तरे :

(1) (a), (c), (d) विधाने अयोग्य आहेत
(2) (a), (b), (c) विधाने अयोग्य आहेत
(3) (b), (c), (d) विधाने अयोग्य आहेत
(4) (c), (d) विधाने अयोग्य आहेत

Which of the following statements are **false** ?

(a) Dr. Babasaheb Ambedkar established 'Harijan Sevak Sangh'.

(b) Dr. Babasaheb Ambedkar started 'Samata' Newspaper from the donation given by Chhatrapati Shahu Maharaj.

(c) In the first Round Table Conference there was dispute between Mahatma Gandhi and Dr. Babasaheb Ambedkar regarding separate constituency for untouchable.

(d) "Mahar Mang Ityadi Lokas Vidya Shikavinyasathi Mandli" to this institution assistance was given by Dakshina Prize fund.

**Answer options :**

(1) (a), (c), (d) statements are false
(2) (a), (b), (c) statements are false
(3) (b), (c), (d) statements are false
(4) (c), (d) statements are false



Scanned with OKEN Scanner

**31.** समाजसुधारकांनी केलेल्या कार्याविषयीच्या जोड्या लावा :

(a) दादोबा पांडुरंग तर्खडकर — (i) मुक्तीसदन

(b) जगन्नाथ शंकर शेठ — (ii) शेतकरी संघ (1927)

(c) पंडिता रमाबाई — (iii) मानव धर्म सभा

(d) पंजाबराव देशमुख — (iv) बॉम्बे नेटिव्ह एज्युकेशन सोसायटी

**पर्यायी उत्तरे :**

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| (1) | (iv) | (i) | (ii) | (iii) |
| (2) | (ii) | (iv) | (i) | (iii) |
| (3) | (iii) | (i) | (ii) | (iv) |
| (4) | (iii) | (iv) | (i) | (ii) |

Match the following works done by Social reformers.

(a) Dadoba Pandurang Tarkhadkar — (i) Mukti-Sadan

(b) Jagannath Shankar Sheth — (ii) Farmers' Federation (1927)

(c) Pandita Ramabai — (iii) Manav Dharma Sabha

(d) Punjabrao Deshmukh — (iv) Bombay Native Education Society

**Answer options :**

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| (1) | (iv) | (i) | (ii) | (iii) |
| (2) | (ii) | (iv) | (i) | (iii) |
| (3) | (iii) | (i) | (ii) | (iv) |
| (4) | (iii) | (iv) | (i) | (ii) |

---

**32.** 1887 मध्ये मद्रास येथे झालेल्या काँग्रेस अधिवेशनाचे अध्यक्ष पद ________ यांनी भूषवले.

(1) दादाभाई नौरोजी (2) म.गो. रानडे

(3) मोरोपंत जोशी (4) बद्रुद्दीन तय्यबजी

________ presided over the congress session held at Madras in 1887.

(1) Dadabhai Nauroji (2) M.G. Ranade

(3) Moropant Joshi (4) Badruddin Tayyabji

---

**33.** 'सर्वसाक्षी जगत्पती। त्याला नकोच मध्यस्थी॥' हे कोणत्या समाजाचे तत्व होते ?

(1) ब्राम्हो समाज (2) आर्य समाज

(3) प्रार्थना समाज (4) सत्यशोधक समाज

'God is the witness of everything. He does not require any middle man'. This was the central of :

(1) Bramho Samaj (2) Arya Samaj

(3) Prarthana Samaj (4) Satyashodhak Samaj

---

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**



Scanned with OKEN Scanner

**34.** इ.स. 1910 मध्ये अलाहाबाद येथे हिंदू महासभेची स्थापना झाली. महासभेचे मुख्य कार्यालय कोठे होते ?

(1) आयोध्या (2) हरिद्वार (3) दिल्ली (4) रामेश्वर

Hindu Mahasabha was established in 1910 at Allahabad. Where was its headquarters ?

(1) Ayodhya (2) Haridwar (3) Delhi (4) Rameshwar

---

**35.** शेतकरी व कारागीर हेच देशाचे खांब आहेत, पण त्यांची दुर्दशा झाली आहे, अशी खंत कोणी व्यक्त केली आहे ?

(1) गणपत पाटील (2) मुकुंदराव पाटील

(3) कृष्णराव भालेकर (4) यशवंतराव देशमुख

Who expressed his grief by saying that farmers and workers are real strong pillars of the nation, but they are now suffering ?

(1) Ganpat Patil (2) Mukundrao Patil

(3) Krishnarao Bhalekar (4) Yashwantrao Deshmukh

---

**36.** अयोग्य कथन ओळखा :

(a) आंतर–राज्य परिषद 28 मे, 1990 रोजी स्थापन झाली.

(b) आंतर–राज्य परिषदेची पुनर्रचना 11 नोव्हेंबर, 1999 मध्ये करण्यात आली.

(c) राष्ट्रीय विकास परिषदेची स्थापना 1950 मध्ये झाली.

पर्यायी उत्तरे :

(1) फक्त (a) (2) फक्त (b) (3) फक्त (c) (4) वरीलपैकी नाही

Select the **incorrect** statement :

(a) The Inter-state council was set up on 28 May, 1990

(b) The Inter-state council was reconstituted on 11 November, 1999

(c) The National Development council was established in 1950

**Answer options :**

(1) Only (a) (2) Only (b) (3) Only (c) (4) None of the abo

---

P.T.

च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK



Scanned with OKEN Scanner

37. जोड्या लावा – (घटना समितीच्या महिला सदस्या)

| 'A' (सदस्य) | 'B' (मतदारसंघ) |
|---|---|
| (a) सरोजिनी नायडू | (i) संयुक्त प्रांत व बेरार |
| (b) मालती चौधरी | (ii) बिहार |
| (c) दक्षयाणी वेलायूदन | (iii) ओरीसा |
| (d) राजकुमारी अमृत कौर | (iv) मद्रास |

**पर्यायी उत्तरे :**

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| (1) | (ii) | (i) | (iv) | (iii) |
| (2) | (ii) | (iii) | (iv) | (i) |
| (3) | (iii) | (ii) | (i) | (iv) |
| (4) | (iv) | (ii) | (iii) | (i) |

Match the pairs - (Women members of Constituent Assembly)

| 'A' (Member) | 'B' (Constituency) |
|---|---|
| (a) Sarojini Naidu | (i) Central Provinces and Berar |
| (b) Malati Chowdhary | (ii) Bihar |
| (c) Dakshayani Velayudan | (iii) Orissa |
| (d) Rajkumari Amrit Kaur | (iv) Madras |

**Answer options :**

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| (1) | (ii) | (i) | (iv) | (iii) |
| (2) | (ii) | (iii) | (iv) | (i) |
| (3) | (iii) | (ii) | (i) | (iv) |
| (4) | (iv) | (ii) | (iii) | (i) |



Scanned with OKEN Scanner

38. जोड्या लावा – (राज्य नीतीची मार्गदर्शक तत्वे)

| 'A' (तत्वे) | | 'B' (कलम) |
|---|---|---|
| (a) काम करण्याचा अधिकार | (i) | 48 |
| (b) समान न्याय आणि मोफत कायदेविषयक साहाय्य | (ii) | 41 |
| (c) गो हत्या प्रतिबंध | (iii) | 44 |
| (d) समान नागरी कायदा | (iv) | 39 A |

पर्यायी उत्तरे :

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| (1) | (iv) | (iii) | (i) | (ii) |
| (2) | (i) | (ii) | (iii) | (iv) |
| (3) | (ii) | (i) | (iv) | (iii) |
| (4) | (ii) | (iv) | (i) | (iii) |

Match the pairs - (Directive Principles of State Policy)

| 'A' (Principle) | | 'B' (Article) |
|---|---|---|
| (a) Right to work | (i) | 48 |
| (b) Equal justice and free Legal aid | (ii) | 41 |
| (c) Prohibition of slaughter of cows | (iii) | 44 |
| (d) Uniform Civil Code | (iv) | 39 A |

**Answer options :**

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| (1) | (iv) | (iii) | (i) | (ii) |
| (2) | (i) | (ii) | (iii) | (iv) |
| (3) | (ii) | (i) | (iv) | (iii) |
| (4) | (ii) | (iv) | (i) | (iii) |

39. खालीलपैकी कोणती जोडी योग्य आहे ?

(a) स्वातंत्र्याचा हक्क - (कलम 14 ते 19)
(b) सांस्कृतिक व शैक्षणिक हक्क - (कलम 29 व 30)
(c) घटनात्मक उपाययोजनेचा हक्क - (कलम 32)
(d) धार्मिक स्वातंत्र्याचा हक्क - (कलम 25 ते 28)

योग्य पर्याय निवडा :

(1) (a), (b), (c) (2) (b), (c), (d) (3) (a), (c), (d) (4) वरील सर्व

Which of the following Pairs are matched **correctly** ?

(a) Right to Liberty - (Art. 14 to 19)
(b) Cultural and Educational Rights - (Art. 29 and 30)
(c) Right to Constitutional Remedies - (Art. 32)
(d) Right to Freedom of Religion - (Art. 25 to 28)

Select **appropriate** options :

(1) (a), (b), (c) (2) (b), (c), (d) (3) (a), (c), (d) (4) All the above



Scanned with OKEN Scanner

40. 'सामाजिक सुरक्षा आणि सामाजिक विमा' हा विषय ________ मध्ये समाविष्ट करण्यात आला आहे.

(1) समवर्ती सूची (2) शेषाधिकार (3) राज्यसूची (4) संघसूची

'Social Security and Social Insurance' is a subject included in ________.

(1) Concurrent list (2) Residuary powers (3) State list (4) Union list

41. प्रतिष्ठा आणि संधी यांच्या समानतेच्या संकल्पनेला भारतीय राज्य घटनेच्या कलम ________ ते ________ मध्ये भरीव आशय व स्वरूप प्रदान करण्यात आले आहे.

(1) 25, 28 (2) 23, 43 (3) 36, 51 (4) 14, 18

The concept of equality of status and opportunity has been given concrete substance and shape in Articles ________ to ________ of the Indian Constitution.

(1) 25, 28 (2) 23, 43 (3) 36, 51 (4) 14, 18

42. भारतीय संविधान सभेच्या विविध समित्यांच्या योग्य जोड्या ओळखा :

| 'A' (समिती) | | 'B' (अध्यक्ष) |
|---|---|---|
| (a) सल्लागार समिती | - | जवाहरलाल नेहरु |
| (b) मूलभूत अधिकार उप–समिती | - | जे.बी. कृपलानी |
| (c) केंद्रीय संविधान समिती | - | जवाहरलाल नेहरु |
| (d) अल्पसंख्याक समिती | - | मौलाना अबुल कलाम आझाद |

पर्यायी उत्तरे :

(1) फक्त (a), (b), (c) (2) फक्त (c), (d) (3) फक्त (b), (c), (d) (4) फक्त (b), (c)

Select the **correct** pairs of various committees of Constituent Assembly of India :

| 'A' (Committee) | | 'B' (Chairman) |
|---|---|---|
| (a) Advisory Committee | - | Jawaharlal Nehru |
| (b) Fundamental Rights Sub - Committee | - | J.B. Kriplani |
| (c) Union Constitution Committee | - | Jawaharlal Nehru |
| (d) Minorities Committee | - | Maulana Abul Kalam Azad |

**Answer options :**

(1) Only (a), (b), (c) (2) Only (c), (d) (3) Only (b), (c), (d) (4) Only (b), (c)

या कामासाठी जागा / **SPACE FOR ROUGH WORK**



Scanned with OKEN Scanner

43. 26 नोव्हेंबर 1949 रोजी खालीलपैकी भारतीय संविधानाच्या कोणत्या तरतूदी अंमलात आल्या ?
(a) नागरिकत्वा संबंधी तरतूदी
(b) निवडणूकां संबंधी तरतूदी
(c) तात्पुरत्या संसदेशी संबंधित तरतूदी
(d) मूलभूत अधिकार

पर्यायी उत्तरे :
(1) (a) आणि (b)
(2) (a), (c) आणि (d)
(3) (a), (b) आणि (c)
(4) यापैकी नाही

Which of the following provisions of the Constitution of India came into force from 26 November 1949 ?
(a) Provisions relating to citizenship.
(b) Provisions relating to elections.
(c) Provisions relating to provisional parliament.
(d) Fundamental Rights.

**Answer options :**
(1) (a) and (b)
(2) (a), (c) and (d)
(3) (a), (b) and (c)
(4) None

44. खालील विधाने विचारात घ्या :
(a) विधानसभा हे कायम स्वरूपी सभागृह आहे.
(b) विधानसभा हे वरिष्ठ सभागृह आहे.
(c) विधानसभेचा सर्वसाधारण कार्यकाल 5 वर्षाचा असतो.
(d) विधानसभा सदस्यासाठी वयाची 30 वर्षे पूर्ण होणे आवश्यक आहे.

वरीलपैकी कोणती विधान/ने चुकीचे आहेत ?
(1) (a), (b) (2) (b), (c), (d) (3) (a), (b), (d) (4) (b), (d)

Consider the following sentences :
(a) Vidhan Sabha is a Permanent House
(b) Vidhan Sabha is a Upper House
(c) Normal tenure of Vidhan Sabha is for five years
(d) Member of Vidhan Sabha must have completed 30 years of age

Which of the following sentence(s) are **false** from above ?
(1) (a), (b) (2) (b), (c), (d) (3) (a), (b), (d) (4) (b), (d)

45. भारतीय राज्यघटनेच्या सरनाम्याच्या संदर्भात खालीलपैकी कोणता क्रम योग्य आहे ?
(1) प्रजासत्ताक, गणराज्य, समाजवादी, सार्वभौम, धर्मनिरपेक्ष
(2) सार्वभौम, समाजवादी, गणराज्य, धर्मनिरपेक्ष, प्रजासत्ताक
(3) सार्वभौम, गणराज्य, प्रजासत्ताक, धर्मनिरपेक्ष, समाजवादी
(4) सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष, प्रजासत्ताक, गणराज्य

Which of the following order is **correct** in relation to the preamble of Indian Constitution ?
(1) Democratic, Republic, Socialist, Sovereign, Secular
(2) Sovereign, Socialist, Republic, Secular, Democratic
(3) Sovereign, Republic, Democratic, Secular, Socialist
(4) Sovereign, Socialist, Secular, Democratic, Republic

**P.T.O.**

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK



Scanned with OKEN Scanner

46. पुढीलपैकी कोणते नियंत्रक व लेखा परीक्षकाचे (CAG) काम नाही ?
(1) शासन खर्चाचे लेखापरीक्षण करणे.
(2) शासन खर्चावर परिणाम करणाऱ्या वित्तिय नियमांचे व आदेशांचे पालन होते आहे किंवा नाही ते पाहणे.
(3) जे पदाधिकारी शासन खर्चाला मंजूरी देत आहेत, ते वैधानिक दृष्ट्या त्या कार्यासाठी सक्षम आहेत की नाही, ते पाहणे.
(4) कल्याणकारी योजनांच्या खर्चाची शिफारस करणे.

Which of the following is **not** one of the functions of the Comptroller and Auditor General ?
(1) to audit government expenditure.
(2) to ensure that financial rules and orders impacting governmental expenditure are obeyed.
(3) to satisfy itself that those who sanction expenditure have the legal powers to do so.
(4) to recommend expenditure for welfare schemes.

47. खालीलपैकी कोणता पर्याय भारताच्या महान्यायवादी संदर्भात चुकीचे आहे ?
(1) राष्ट्रपती सरकारच्या सल्ल्याने महान्यायवादीची नियुक्ती करतात.
(2) तो/ती सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीश पदी नियुक्त होण्यास पात्र असणारी व्यक्ति असावी.
(3) त्याने कोणत्याही उच्च न्यायालयात दहा वर्षे न्यायाधीशपदी काम केले असले पाहीजे.
(4) वरीलपैकी एकही नाही.

Which of the following option is **not correct** about India's Attorney General ?
(1) Attorney General is appointed by the President on the advice of Government.
(2) He/She must be a person who is qualified to be appointed as a judge of the Supreme Court.
(3) He/She should have served as a judge in any High Court for ten years.
(4) None of the above.

48. भारतातील संघराज्य व्यवस्थेच्या संदर्भात, खालील कोणती वैशिष्ट्ये योग्य आहेत ?
(a) संविधानाची सर्वोच्चता
(b) केंद्र व राज्य सरकारांमध्ये सत्तेची विभागणी
(c) स्वतंत्र न्यायव्यवस्थेचे अस्तित्व
(d) केंद्रीय मंत्रीमंडळाची सर्वोच्चता

खालील दिलेल्या संकेतातून योग्य उत्तर निवडा :
(1) (a), (b) आणि (d) (2) (b) आणि (c) फक्त (3) (b), (c) आणि (d) (4) (a), (b) आणि (c)

In the context of Federal system in India, which of the following characteristics are **correct** ?
(a) Supremacy of the Constitution.
(b) Division of powers between Union and the State Governments.
(c) Existence of an independent judiciary.
(d) Supremacy of the Union Cabinet.

Select the **correct** answer from the codes given below :
(1) (a), (b) and (d) (2) (b) and (c) only (3) (b), (c) and (d) (4) (a), (b) and (c)

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK



Scanned with OKEN Scanner

**49.** एस्.आर्. बोम्मई विरुद्ध भारत सरकार या खटल्यात सर्वोच्च न्यायालयाने पुढीलपैकी कोणती भूमिका घेतली ?

(1) राज्यसरकारचे बहुमत विधान सभेत तपासले गेले पाहिजे.
(2) अनुच्छेद 356 लागू करण्यापूर्वी मुख्यमंत्र्यांचा सल्ला घेण्यात आला पाहिजे.
(3) राज्यपालांना नकाराधिकार दिला गेला पाहिजे.
(4) राज्यांना त्यांनी गोळा केलेल्या करातून मोठा वाटा दिला गेला पाहिज़े.

What did the Supreme Court hold in the S.R. Bommai Vs. Union of India case ?

(1) Majority of the State Government should be tested and proved on the floor of the House.
(2) The Chief Minister should be consulted before imposing Article 356.
(3) Veto power should be given to the Governor.
(4) States should get a bigger share of the taxes collected by them.

---

**50.** गिलोटिनचे तत्व म्हणजे ________.

(1) एकूण रकमेमधून विशिष्ट रक्कम कपात करणे.
(2) एकूण रकमेमधून रु. 100 फक्त कपात करण्याची मागणी करणे.
(3) एकूण रकमेमधून फक्त रु. 1 कपात करण्याची मागणी करणे.
(4) कोणत्याही चर्चा किंवा छाननीशिवाय मागणीवर थेट मतदान घेणे.

Principle of Guillotine means ________.

(1) A specific amount of sum is reduced.
(2) The amount of demand is reduced by Rs. 100 only.
(3) The amount of demand to be reduced to Re. 1.
(4) The demands are directly put to vote without any discussion or Scruitiny.

---

**51.** 2011 मध्ये कोणत्या भारतीय पंतप्रधानांना बांग्लादेश सरकारने 'बांग्लादेशी स्वाधीनता सन्मानोन पुरस्कारा' ने गौरवीले ?

(1) राजीव गांधी (2) इंदिरा गांधी
(3) मनमोहन सिंग (4) अटलबिहारी वाजपेयी

In 2011, which Indian Prime Minister was honoured with 'Bangladeshi Swadhinta Sammanon Award' by the Bangladeshi Government ?

(1) Rajiv Gandhi (2) Indira Gandhi
(3) Manmohan Singh (4) Atal Bihari Vajpayee

---

**52.** राज्यपालांच्या संबंधी खालीलपैकी कोणते विधान सत्य आहे ?

(1) राज्यपाल हे पहिल्या परिशीष्टामध्ये नमूद केलेल्या संसदेच्या सभागृहाचा किंवा कोणत्याही राज्याच्या विधीमंडळाच्या सभागृहाचा सदस्य असू शकत नाही.
(2) राज्यपालांच्या कार्यकाळात त्यांचे वेतन व भत्त्यात कपात केली जाणार नाही.
(3) राष्ट्रपतींची मर्जी असेपर्यंत राज्यपाल आपल्या पदावर राहू शकतात.
(4) वरीलपैकी सर्व.

Which of the following statements is **true** about the Governor ?

(1) The Governor shall not be a member of either House of Parliament or of a House of the legislature of any state specified in the first schedule.
(2) The emolument and allowances of the Governor shall not be diminished during his term of office.
(3) The Governor shall hold office during the pleasure of the President.
(4) All of the above.

---



कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK



Scanned with OKEN Scanner

53. भारतीय राज्यघटने संदर्भात खालीलपैकी कोणती विधाने योग्य आहेत ?

(a) अनुच्छेद 368 अनुसार राज्यघटना दुरुस्त करावयाची असल्यास संसदेच्या दोन्ही सभागृहाच्या एकूण सदस्यसंख्येच्या दोन-तृतीयांश बहुमताची आवश्यकता असते.

(b) घटक राज्यात एखादे विधेयक हे अर्थ विधेयक आहे किंवा नाही असा प्रश्न उपस्थित झाल्यास राज्यपालांनी दिलेला निर्णय अंतीम असतो.

(c) कोणत्याही विभागीय अथवा प्रशासनिक खटल्यासह सर्व खटल्यात कोणत्याही व्यक्तिस एकाच गुन्ह्यासाठी एकापेक्षा अधिक वेळी आरोपी केले जाणार नाही व एकापेक्षा अधिक वेळा शिक्षा दिली जाणार नाही.

खाली दिलेल्या पर्यायातून योग्य उत्तराची निवड करा.

(1) (a) आणि (b) (2) (b) आणि (c) (3) वरीलपैकी एकही नाही (4) फक्त (c)

Which among the following statements are **correct** regarding the Indian Constitution ?

